ePaper

## महाराष्ट्रात धडकणार मोठं संकट, पुढील 48 तास धोक्याचे, IMD कडून हाय अलर्ट

वर्ष - 9 । अंक -45 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



### आतील पानांत


- कारवाईच्या भीतीने भाजप कार्यकर्त्यांचे मौन
- पिंपरी चिंचवडची अंतिम प्रभाग रचना मंजूर
- विनोदकुमार शुक्ल यांचा 'रॉयल्टी थरार'
- मानवी जीवन अधिक सुखकर-अजय देशपांडे


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 7 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका** 247 नगरपालिका,147 नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर

# नगरपरिषदांमध्ये 'महिला राज'!

## राज्यातील नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदांची सोडत जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील सर्व राजकीय पक्षांसमोर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी गती प्राप्त झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या 31 जानेवारी 2026 पर्यंत निवडणुका घेण्याच्या आदेशानुसार, राज्य निवडणूक आयोगाने 247 नगरपालिका आणि 147 नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत जाहीर केली.**



तसेच, सहा नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जमाती (एसटी) महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये भडगाव (जळगाव), वणी, पिंपळनेर (धुळे), उमरी (नांदेड), यवतमाळ आणि शेंदूरजनघाट या नगरपालिकांचा समावेश आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, नगराध्यक्षपदावर महिलांसाठी आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय पक्षांच्या रणनीतीत वेग आला आहे. एससी-एसटी महिला उमेदवारांसाठी संधी निर्माण झाली असून, स्थानिक




नेतृत्वात महिलांचा सहभाग वाढेल. या आरक्षणामुळे आगामी निवडणुकीत महिलांच्या प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक प्रशासनानेही या निर्णयाची माहिती संबंधित नगरपालिकांना पाठवून, निवडणूक प्रक्रियेत महिलांसाठी योग्य तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत.

### आरक्षणामुळे नगरपरिषदांमध्ये 'महिला राज'

मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात या सोडतीचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी 33 नगरपरिषदांपैकी 16 नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीर झाले असून, या आरक्षणामुळे नगरपरिषदांमध्ये महिलांचा दबदबा वाढण्याची अपेक्षा आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे राजकीय पक्षांमध्ये रणनीती आखण्याची सुरुवात झाली असून, महिलांसाठी राखीव पदांमुळे आगामी निवडणुकांमध्ये 'महिला राज' प्रस्थापित होणार आहे. सोडतीच्या कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### 33 पैकी 16 नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीर

**देऊळगावराजा :** महिला प्रवर्ग आरक्षित
**मोहोळ :** महिला प्रवर्ग आरक्षित
**तेल्हारा :** महिला प्रवर्ग आरक्षित
**ओझर :** महिला प्रवर्ग आरक्षित
**वानाडोंगरी :** महिला प्रवर्ग आरक्षित
**भुसावळ :** महिला प्रवर्ग आरक्षित
**घुग्गूस :** महिला प्रवर्ग आरक्षित
**चिमूर :** महिला प्रवर्ग आरक्षित
**शिर्डी :** महिला प्रवर्ग आरक्षित
**सावदा :** महिला प्रवर्ग आरक्षित
**मैनदर्गी :** महिला प्रवर्ग आरक्षित
**दिगडोहदेवी :** महिला प्रवर्ग आरक्षित
**दिग्रस :** महिला प्रवर्ग आरक्षित
**अकलूज :** महिला प्रवर्ग आरक्षित
**बीड :** महिला प्रवर्ग आरक्षित
**शिरोळ :** महिला प्रवर्ग आरक्षित

अनुसूचित जमातीमध्ये प्रवर्गात महिला आरक्षण
**भडगाव** (जळगाव)
वणी
**पिंपळनेर** (धुळे)
**उमरी** (नांदेड)
**यवतमाळ**
**शेंदूरजनघाट**

### 67 नगरपरिषदपैकी 34 ओबीसी महिलांसाठी आरक्षित

**भगूर** – ओबीसी महिला
**इगतपुरी** – ओबीसी महिला
**विटा** – ओबीसी महिला
**बल्हारपूर** – ओबीसी महिला
**धाराशिव** – ओबीसी महिला
**भोकरदन** – ओबीसी महिला
**जुन्नर** – ओबीसी महिला
**उमरेड** – ओबीसी महिला
**दौंड** – ओबीसी महिला
**कुळगाव बदलापूर** – ओबीसी महिला
**हिंगोली** – ओबीसी महिला
**फुलगाव** – ओबीसी महिला
**मुरुड जंजिरा** – ओबीसी महिला
**शिरूर** – ओबीसी महिला
**काटोल** – ओबीसी महिला
**माजलगाव** – ओबीसी महिला
**मूल** – ओबीसी महिला
**मालवण** – ओबीसी महिला
**देसाईगंज** – ओबीसी महिला
**हिवरखेड** – ओबीसी महिला
**अकोट** – ओबीसी महिला
**मोर्शी** – ओबीसी महिला
**नेर- नवाबपूर** – ओबीसी महिला
**औसा** – ओबीसी महिला
**कर्जत** – ओबीसी महिला
**देगलूर** – ओबीसी महिला
**चोपडा** – ओबीसी महिला
**सटाणा**- ओबीसी महिला
**दोंडाईचा वरवडे** – ओबीसी महिला
**बाळापूर** – ओबीसी महिला
**रोहा** – ओबीसी महिला
**कुरडुवादी** – ओबीसी महिला
**धामणगावरेल्वे** – ओबीसी महिला
**वरोरा** – ओबीसी महिला

## सुरेंद्र पठारेंच्या पक्ष प्रवेशाच्या चर्चेमुळे पुण्यात अंतर्गत वाद उफाळला

# कारवाईच्या भीतीने भाजप कार्यकर्त्यांचे मौन

### महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार शहरातील मतदार संघांमध्ये दारो-दारी दौरे करत आहेत, तसेच राजकीय गोटांमध्ये पक्षांच्या रणनीतींची चर्चा जोरात सुरू आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) वडगाव शेरी विधानसभा मतदार संघाचे आमदार बापू पठारे यांचे पुत्र चिरंजीव सुरेंद्र पठारे भाजपमध्ये प्रवेश घेण्याच्या चर्चेमुळे भाजपमध्ये अंतर्गत वाद उफाळला आहे.**



भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये या चर्चेने अस्वस्थतेची लाट निर्माण केली आहे. काही दिवसांपूर्वीच पठारे यांनी या प्रवेशाच्या चर्चेवर अफवा असल्याचा खुलासा केला होता, तरीही स्थानिक नेत्यांकडून पक्षात सुरू असलेल्या घडामोडींचा वेग पाहता कार्यकर्त्यांमध्ये काळजी आणि असंतोष जाणवू लागला आहे. भाजपमधील स्थानिक पदाधिकारी, नेते आणि इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये प्रवेशाच्या चर्चेच्या भीतीमुळे गहन चर्चा सुरु आहे. पक्षाच्या शिस्तीला धोका आणि महापालिका निवडणुकीत उमेदवारी नाकारली जाण्याची भीती कार्यकर्त्यांमध्ये स्पष्ट दिसत आहे. अनेक कार्यकर्ते मौन बाळगून आहेत, तरीही स्थानिक नेते मंडळींनी मुंबईपर्यंत प्रवेश रोखण्यासाठी ताकद लावली असल्याचे स्थानिक सूत्रांनी सांगितले.

**असंतोषाचे कारण:**

भाजपमध्ये प्रवेशाच्या चर्चेमुळे स्थानिक पातळीवरील नेत्यांमध्ये नाराजी वाढत आहे. काही पदाधिकाऱ्यांनी मंडल अध्यक्षांना पत्र पाठवून विरोध दर्शविण्यास सुरुवात केली आहे. विरोधाचे मुख्य कारण म्हणजे पक्षामध्ये पूर्वीपासून निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारीसाठी संधी न मिळणे. स्थानिक नेते मंडळींच्या म्हणण्यानुसार, महापालिका निवडणुकीत पक्षाच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना संधी देणे गरजेचे आहे. पक्ष प्रवेशाच्या चर्चेमुळे काही वडगावशेरी मतदार संघातील माजी नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. यामध्ये त्यांच्या उमेदवारीसाठी किंवा इतर महत्त्वाच्या पदांसाठी स्थानिक नेत्यांकडून शब्द दिले गेले आहेत. ही स्थिती पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि असंतोष निर्माण करत आहे.

स्थानिक नेत्यांचा विरोध: वडगावशेरी विधानसभा मतदार संघातील एका माजी सरचिटणीसांनी मंडल अध्यक्षांना पत्र पाठवून प्रामाणिक कार्यकर्त्यांना संधी देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, पक्ष प्रवेशासाठी काही उच्चस्थ पदाधिकाऱ्यांनी आपल्या हितासाठी निर्णय घेतल्यास कार्यकर्त्यांचा विश्वास घटेल आणि पक्षाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल. भाजपच्या स्थानिक नेतृत्वात प्रवेश चर्चांमुळे काही पदाधिकाऱ्यांमध्ये वादग्रस्त वातावरण निर्माण झाले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षामध्ये अंतर्गत तणाव वाढल्याने कामकाजात बाधा निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**महापालिका निवडणुकीवरील परिणाम:**

भाजपच्या वडगावशेरी विधानसभा मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या असंतोषामुळे महापालिका निवडणुकीत पक्षाच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो. कार्यकर्त्यांनी मौन राखले तरीही, निवडणूक प्रक्रिया आणि उमेदवारीची तयारी ही चर्चेच्या केंद्रस्थानी राहणार आहे. प्रवेश चर्चेमुळे पक्षातील आंतरिक तणाव स्पष्ट होत असून, आगामी निवडणुकीत उमेदवार निवडीवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

**राजकीय विश्लेषकांचे मत:**

भविष्यातील अपेक्षा: आगामी काळात वडगावशेरी मतदार संघातील प्रवेशाचे अंतिम निर्णय घेण्यात येणार आहेत.

### प्रवेश चर्चांमुळे पक्षातील शिस्त आणि विश्वास संकटात

राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक कार्यकर्त्यांना संधी न मिळाल्यास पक्षाच्या लोकप्रियतेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. पक्ष प्रवेशाच्या चर्चेत स्थानिक नेत्यांचा हस्तक्षेप आणि उमेदवार निवडीतील असमानता ही पक्षाच्या शिस्तीला आव्हान ठरू शकते. तसेच, भाजपसाठी विरोधी पक्षांसाठी संधी निर्माण होण्याची शक्यता आहे, कारण स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांचा विश्वास कमी झाला आहे.

## गुंड निलेश घायवळच्या घरांवर पोलिसांकडून छापेमारी

# जिवंत काडतुसे आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोथरूड गोळीबार प्रकरणानंतर गुंड निलेश घायवळ आणि त्याच्या टोळीवर आता पोलिसांनी मोठा डाव टाकला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी घायवळसह दहा जणांविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (MCOCA) कारवाई केली असून, यानंतर पुणे पोलिसांनी गेल्या दोन दिवसांपासून कोथरूड परिसरातील त्याच्या दोन घरांवर छापेमारी सुरू केली आहे. पोलिसांना जिवंत काडतुसे, मालमत्तांशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे संशयास्पद वस्तू हाती लागल्या आहेत.**




समोर आलेल्या माहितीनुसार, निलेश घायवळच्या कोथरूडमधील घरात छापेमारीदरम्यान जिवंत काडतुसे सापडली आहेत. विशेष म्हणजे, घायवळकडे कोणताही शस्त्र परवाना नसतानाही ही काडतुसे सापडल्याने पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल केला आहे. कोथरूड पोलीस ठाण्यात या प्रकरणी शस्त्र परवाना नसताना काडतुसे बाळगल्याबाबत निलेश घायवळविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांच्या तपासात हेही समोर आले आहे की, निलेश घायवळने बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्ट तयार करून परदेशात पलायन केल्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलीस आयुक्तांनी त्याचा पासपोर्ट रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, त्याची बँक खाती तसेच बेकायदेशीर मालमत्ता गोठवण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी त्याच्या विविध ठिकाणांवरील घरांवर आणि कार्यालयांवर छापेमारी मोहीम सुरू केली आहे.

छापेमारीदरम्यान पोलिसांच्या हाती विविध मालमत्तांशी संबंधित सातबारे उतारे, साठेखत, जमिनींची कागदपत्रे आणि काही महत्त्वाच्या फाइल्स लागल्या आहेत. विशेष म्हणजे, मराठवाड्यातील पवनचक्की प्रकल्पासंदर्भातील काही महत्त्वाच्या फाइल्सदेखील जप्त करण्यात आल्या आहेत. या फाइल्समुळे घायवळच्या आर्थिक गुन्ह्यांचा तपास आणखी खोलात जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, निलेश घायवळच्या बेकायदेशीर मालमत्तांवर कारवाई करण्यासाठी पुणे पोलिसांनी महापालिकेलाही पत्र पाठवले आहे.

### घायवळवर MCOCA अंतर्गत कारवाई

कोथरूड गोळीबार प्रकरणात गुंड निलेश पोलिसांची दोन दिवसांपासून कोथरूडमधील घरांवर छापेमारी
जिवंत काडतुसे, शस्त्र परवाना नसतानाही जप्त
मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे आणि फाइल्स पोलिसांच्या ताब्यात
बनावट कागदपत्रांवर पासपोर्ट तयार करून विदेशात पलायनाचा संशय
पासपोर्ट रद्द, बँक खाती आणि बेकायदेशीर मालमत्ता गोठवण्याचे आदेश
मराठवाड्यातील पवनचक्की प्रकल्पाशी संबंधित कागदपत्रे सापडली
पुणे महानगरपालिकेला घायवळच्या मालमत्तांवर कारवाईचे निर्देश
अनधिकृत बांधकामे आणि थकीत कर असलेल्या मालमत्तांवर जप्तीची तयारी
पोलिस आणि मनपाची संयुक्त कारवाई लवकरच सुरू होणार


## महापालिका निवडणूक — प्रभागाच्या हद्दीबाबत 22 सूचना व हरकती पूर्णतः मान्य

# पिंपरी चिंचवडची अंतिम प्रभाग रचना मंजूर

### महापालिकेच्या संकेतस्थळावर ,मुख्यालय आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयात अंतिम प्रभाग रचना पाहता येणार

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना सोमवारी (दि . 6) जाहीर झाली. प्रारूप प्रभाग रचनेवर घेतलेल्या 318 हरकती व सूचनांपैकी प्रभागाच्या हद्दीबाबत 22 सूचना व हरकती पूर्णतः मान्य करण्यात आले आहेत. तर 3 अंशतः मंजूर केल्या आहे. प्रभागाच्या व्याप्ती आणि वर्णनाबाबत आलेल्या तीन सूचना मंजूर करत अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात आलेली आहे.**




महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने एप्रिलमध्ये दिला. त्यानंतर चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे निवडणूक घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार प्रभाग रचना तयार करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेच्या निवडणूक विभागाला दिला. त्याप्रमाणे प्रशासनाने ३२ प्रभागांतील १२८ जागांसाठी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा तयार करून राज्य नगरविकास विभागाला सादर केला होता. नागरिकांच्या हरकती व सूचनांसाठी तो २२ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला. त्यावर चार सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या होत्या. प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच असल्याने अनेकांचा जीव भांड्यात पडला. मात्र, तरीही ३१८ हरकती व सूचना नोंदवल्या गेल्या आहेत. त्यावर सुनावणी होऊन नगरविकास विभागाला प्रारूप प्रभाग रचना अंतिम मान्यतेसाठी पाठवली. चार ते सहा ऑक्टोबर दरम्यान दिलेल्या अंतिम मुदतीमध्ये शेवटच्या दिवशी या अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात आलेली आहे.

**असे आहेत बदल**

प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 1 मध्ये समाविष्ट असलेली ताम्हाणे वस्ती आता अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 12 मद्ये समाविष्ट करणेत आली आहे .

प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 6 मधील गावजत्रा मैदान आणि मनपा हॉस्पिटल इत्यादी भाग अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 7 मध्ये समाविष्ट करणेत आला आहे

प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग 24 मधील म्हातोबा वस्ती चा भाग अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग 25 मध्ये समाविष्ट करणेत आला आहे.

प्रभाग रचनेमध्ये अन्य कोणताही बदल नाही असे निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

प्रारूप प्रभाग रचनेवर 318 हरकती आणि सूचना घेण्यात आल्या होत्या मात्र किरकोळ स्वरूपात यावर दखल घेण्यात आली आहे. प्रभागांच्या नाव आणि व्याप्ती संदर्भात आलेल्या सूचनानुसार प्रभाग क्रमांक दहा येथील अण्णासाहेब मगर नगर, टिपू सुलतान नगर, बी.एस. एन.एल. परिसर एम.आय.डी.सी. ऑफीस चिंचवड या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक १० मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता. अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.प्रभाग क्रमांक ११ भिमशक्तिनगर या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक ११ मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता. अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.प्रभाग क्रमांक २६.वाकड या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक २६ मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता. अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.

### पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार)

| | |
|---|---|
| एकूण | : १७,२७,६९२ |
| अनुसूचित जाती | : २,७३,८१० |
| अनुसूचित जमाती | : ३६,५३५ |

### प्रारूप रचनेतील उल्लेखनीय प्रभाग आणि लोकसंख्या

सर्वाधिक लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ९ : नेहरूनगर-मासुळकर कॉलनी : ५९,३१०
सर्वांत कमी लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ५ : भोसरी-गवळीनगर-चक्रपाणी वसाहत : ४९,०४९
सर्वाधिक अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १३ : निगडी-यमुनानगर : १५,७७०
सर्वांत कमी अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १५ : आकुर्डी प्राधिकरण : ३,३९१
सर्वाधिक अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग ४ : दिघी-बोपखेल : ४,२८६
सर्वांत कमी अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग १९ : एम्पायर इस्टेट चिंचवड स्टेशन : ३८९.

# आमदार सुनील शेळके यांचा "मास्टर स्ट्रोक"!

## स्थानिक स्वराज्य निवडणुकीची तयारी: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची देहु शहरात जब्बो कार्यकारिणी जाहीर

। मावळ । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या देहु शहर शाखेची 160 जणांची जब्बो कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. ही कार्यकारिणी विविध क्षेत्रांतील प्रतिनिधित्वाचा भक्कम नमुना असून, यामध्ये कामगार सेल, क्रीडा सेल, सोशल मिडिया सेल, ओबीसी सेल, शेतकरी सेल आदींचा समावेश करण्यात आला आहे.**



कार्यकारिणीची घोषणा देहु शहर अध्यक्ष विवेक काळोखे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक, व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय आणि मावळचे लोकप्रिय आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली मावळ परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार मुसंडी मारली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे वर्चस्व अधिक भक्कम करण्यासाठी सुनील शेळके यांनी स्वतः मैदानात उतरून संघटन बळकट करण्यास सुरुवात केली आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली पायाभूत सुविधा, रस्ते, पाणी, कचरा व्यवस्थापन, तसेच नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांवर वेगाने निर्णय घेतले जात आहेत. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये समाधान असून, "राष्ट्रवादी सुसाट आहे", अशीच चर्चा सर्वत्र आहे. या जंबो कार्यकारिणीमुळे देहु शहरात राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ संघटनात्मक ताकदच वाढवली नाही, तर विविध समाजघटक, युवा, महिलावर्ग आणि शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करून सर्वसमावेशकता जपली आहे.

संघटन, विकास आणि विजयाची त्रिसूत्री! कार्यकारिणी जाहीर करताना अध्यक्ष विवेक काळोखे यांनी सांगितले की, "या नव्या टीमच्या माध्यमातून देहु शहरात पक्ष अधिक कार्यक्षम, लोकाभिमुख आणि जनतेशी थेट जोडलेला राहील. विकास आणि जनतेच्या हितासाठी ही टीम सतत सक्रिय राहणार आहे." ही जब्बो कार्यकारिणी म्हणजे केवळ सदस्यांची यादी नाही, तर येत्या काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी एक भक्कम रणनिती आहे. आमदार सुनील शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस देहु शहरात नवसंजीवनी घेत आहे.

# समाजाच्या संवेदनशीलतेचा क्षय की आधुनिकतेचा दुष्परिणाम?



## भूमिका

**देशभरात वृद्धांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. ‘एनसीआरबी २०२३’च्या आकडेवारीनुसार केवळ एका वर्षात देशात वृद्धांविरुद्ध हजारो गुन्हे नोंदवले गेले. मध्य प्रदेशात तब्बल ५७३८ प्रकरणे, तर महाराष्ट्रात ५११५ प्रकरणे नोंदली गेली आहेत..**

त्याचप्रमाणे तमिळनाडू, कर्नाटक, दिल्ली आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांतही ही आकडेवारी सतत वाढती आहे. या आकडेवारीकडे केवळ आकड्यांच्या दृष्टीने पाहणे पुरेसे नाही—तर या मागील सामाजिक, आर्थिक, आणि मानसिक पार्श्वभूमी समजून घेणे तितकेच आवश्यक आहे. भारतीय समाजात पारंपरिक संयुक्त कुटुंबव्यवस्थेने अनेक दशकं वृद्धांना आधार दिला. मात्र, शहरीकरण, स्थलांतर आणि बदलत्या जीवनशैलीमुळे एकल व विभक्त कुटुंबसंरचना वाढली. यामुळे वृद्धांना घरात आणि समाजात मिळणारा भावनिक व शारीरिक आधार हरवला. अनेक वृद्ध आज एकटे राहतात—मुलं परदेशात किंवा दुसऱ्या शहरांत असतात, तर शेजारीपणाचा भाव हरवतो. या सामाजिक अलगावामुळे वृद्धांवरील अत्याचार ओळखणे आणि थांबवणे कठीण बनते.

अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक साधनांचा आधार पेन्शन, बचत किंवा मुलांकडून मिळणाऱ्या सहाय्यावर असतो. जेव्हा हे



स्रोत मर्यादित किंवा अनिश्चित असतात, तेव्हा वृद्ध सहजपणे आर्थिक शोषणाचे लक्ष्य बनतात. अनेकदा नातेवाईकच संपत्तीवर ताबा मिळवण्यासाठी मानसिक दबाव आणतात, तर काही जण वृद्धांच्या बँक खात्यांचा गैरवापर करून फसवणूक करतात. वृद्धांना त्यांच्या मालमत्तेवरचे अधिकार टिकवण्यासाठी कायदेशीर प्रक्रियांचा सामना करावा लागतो, जो त्यांच्यासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकवणारा असतो. डिजिटलीकरण आणि ऑनलाइन व्यवहारांच्या युगात तंत्रज्ञानाने जरी सोय केली असली तरी त्याचा गैरफायदा घेणाऱ्यांनी वृद्धांना सर्वाधिक लक्ष्य केले आहे. ओटीपी स्कॅम्स, बनावट बँक कॉल्स, फिशिंग ईमेल्स आणि फसवे गुंतवणूक सल्ले हे वृद्धांच्या आर्थिक सुरक्षेसाठी मोठा धोका ठरले आहेत. त्यांची डिजिटल साक्षरता कमी असल्याने ते सहज फसवले जातात. अशा प्रकारच्या फसवणुकीत फक्त आर्थिक नुकसान होत नाही, तर त्यांचा आत्मविश्वास आणि सामाजिक विश्वास दोन्ही ढासळतात.

पूर्वी वृद्धांना कुटुंबातील मार्गदर्शक, अनुभवाचे भांडार आणि निर्णयकर्ते मानले जात होते. मात्र आजच्या पिढीत कार्यक्षमतेला वयापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. निवृत्तीनंतर समाजातील त्यांची भूमिका सीमित होते, आणि अनेकदा ते ‘निष्क्रिय’ समजले जातात. या मानसिकतेमुळे त्यांचा आत्मसन्मान कमी होतो. जेव्हा एखाद्याला घरात किंवा समाजात आपले मत महत्त्वाचे नाही असे वाटते, तेव्हा ते मानसिकदृष्ट्या खचतात, आणि हेच मानसिक दुर्बलतेचे रूप पुढे शोषणासाठी पोषक वातावरण तयार करते.

कायद्याअंतर्गत मुलांनी आपल्या पालकांची जबाबदारी घ्यावी, अशी तरतूद आहे. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र अत्यल्प आहे. अनेक वृद्धांना तक्रार कशी करायची, कुठे जायचे, याबद्दल माहिती नसते. पोलिस यंत्रणा अनेकदा या प्रकरणांकडे ‘कौटुंबिक वाद’ म्हणून दुर्लक्ष करते. न्यायप्रक्रिया धीमी असल्याने वृद्धांना न्याय मिळण्यात विलंब होतो आणि विश्वास हरवतो.

दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळुरूसारख्या महानगरांमध्ये वृद्धांवरील गुन्ह्यांचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा अधिक आहे. यामागे कारण म्हणजे शहरी जीवनशैलीतील अलगाव, विभक्त कुटुंबप्रणाली आणि सामाजिक संवादाचा अभाव. महानगरांतील फ्लॅट संस्कृतीत शेजाऱ्यांशी संबंध कमी असतात, त्यामुळे घरातील हिंसा किंवा अत्याचार ओळखणे अवघड जाते. सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता आणि वाहतुकीची गोंधळलेली परिस्थिती वृद्धांच्या सुरक्षिततेला आणखी धोकादायक बनवते.

## प्रासंगिक »

# मॅच भी जितो और दिल भी!

***गव्हाच्या आधारभूत किमतीत १०९ टक्क्यांची वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय राजकीय असेल, पण त्यामुळे देशाच्या कृषी प्रारूपाविषयी प्रश्न निर्माण होतात...***

खेळ हे राष्ट्रीययत्वाचे प्रतीक असतात. आपण क्रिकेटचा वर्ल्ड कप उंचावल्यानंतर त्या जल्लोषामध्ये संपूर्ण देश एकवटून, देहभान हरपून सहभागी होतो. मेस्सीने उंचाविलेला वर्ल्ड कप कर्जबाजारी अर्जेंटिनाला उभारी देतो. तर ऑलिम्पिक स्पर्धांच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागतो. पाकिस्तानात क्रिकेट खेळण्यासाठी जात असलेल्या भारतीय संघाला तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी दिलेला – ‘मॅच भी जितो और दिल भी’, हा संदेश आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘स्पोर्ट्स डिप्लोमसी’चा मानदंड ठरला. खेळ हा केवळ मैदानात खेळला जात नाही, तर कोट्यवधी-अब्जावधी क्रीडारसिकांच्या मनावर गारूड करतो. म्हणूनच की काय, खेळाडू हे केवळ स्टार्स ठरत नाहीत, तर ते क्रीडा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक अशा अनेक आघाड्यांवरील राजदूत बनतात.

साहित्यविश्वात लेखकाला रॉयल्टी मिळते, हे आपण अनेकदा ऐकतो. पण ती प्रत्यक्षात किती असते, हे फार कमी वेळा स्पष्टपणे समोर येतं. अलीकडेच हिंदीतील प्रख्यात लेखक, कवी विनोदकुमार शुक्ल यांना त्यांची प्रकाशनसंस्था ‘हिन्द युग्म’ यांनी एका समारंभात तब्बल ३० लाख रुपयांची रॉयल्टी दिली. विशेष म्हणजे ही रक्कम फक्त त्यांच्या एका पुस्तकाची — ‘दीवार में एक खिड़की रहती थी’ — विकल्या गेलेल्या ८६ हजार प्रतींवर आधारित होती!

# विनोदकुमार शुक्ल यांचा ‘रॉयल्टी थरार’

हा आकडा ऐकून हिंदी आणि मराठी दोन्ही साहित्यवर्तुळांत एकच खळबळ उडाली. कारण, मराठी प्रकाशन विश्वात इतक्या मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी दिल्याची घटना आजवर ऐकिवात नाही. अनेकांना हे अविश्वसनीय वाटलं; तर काहींनी यामागचं पार्श्वभूमी विश्लेषित करण्याचा प्रयत्न केला.

**फसवणुकीतून पारदर्शकतेकडे – ‘हिन्द युग्म’चा प्रवास**

विनोदकुमार शुक्ल यांनी काही वर्षांपूर्वी ‘राजकमल’ आणि ‘वाणी’ या हिंदीतील प्रतिष्ठित प्रकाशनांबाबत कडव्या शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की, या प्रकाशकांनी त्यांच्या रॉयल्टीबाबत फसवणूक केली.

त्याच काळात हिंदीतील समकालीन लेखक मानव कौल यांनीही या संदर्भात सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया दिली होती. या सर्व गदारोळानंतर शुक्ल यांनी त्यांच्या सर्व साहित्याच्या प्रकाशनाचे हक्क ‘हिन्द युग्म’ या तुलनेने नव्या पण पारदर्शक प्रकाशनसंस्थेकडे सोपवले.

हिन्द युग्मने सुरुवातीपासूनच एक स्पष्ट भूमिका घेतली – लेखकांसाठी



रॉयल्टी, विक्री आणि वितरण याविषयी उघड आणि प्रामाणिक व्यवहार. या प्रकाशनाने त्यांच्या सर्व लेखकांच्या विक्रीचा आकडा सार्वजनिक केला, जे भारतीय प्रकाशनविश्वात अभावाने घडते.

**ज्ञानपीठ सन्मानानंतर वाढलेली मागणी**

मार्च महिन्यात विनोदकुमार शुक्ल यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. त्याआधी काही महिन्यांपूर्वी अचल मिश्रा दिग्दर्शित ‘चार फूल हैं और दुनिया है’ या माहितीपटामुळे शुक्ल यांच्या लेखनाची नवी ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचली.

या दोन्ही घटनांमुळे शुक्ल यांची पुस्तके नव्या वाचकवर्गात लोकप्रिय झाली. साहित्य अकादमी आणि ज्ञानपीठ अशा दोन प्रतिष्ठित सन्मानांचा प्रभाव पुस्तक विक्रीत दिसून आला. ‘हिन्द युग्म’च्या व्यवस्थित वितरण जाळ्यामुळे या मागणीला तात्काळ प्रतिसाद मिळाला आणि हजारोंच्या संख्येने पुस्तके विकली गेली.

‘हिन्द युग्म’ने फक्त प्रकाशनच नाही तर वितरण आणि विपणन यांचंही सशक्त जाळं उभारलं आहे. भारतातील लहान शहरांपर्यंत, जिथे मराठी प्रकाशकांनाही पुस्तके पोहोचवताना अडचणी येतात, तिथेही ‘हिन्द युग्म’ची पुस्तके सहज उपलब्ध आहेत.

त्यांनी ऑनलाइन विक्री, सोशल मीडियावरील प्रमोशन, डिजिटल बुक फेअर्स, तसेच वाचकांशी थेट संवाद यासारख्या आधुनिक पद्धती अवलंबल्या आहेत. यामुळे पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचण्याचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी झाले. या घटनेत सर्वाधिक लक्ष वेधून घेतलेली गोष्ट म्हणजे रॉयल्टीचा आकडा नव्हे, तर त्यामागील दृष्टिकोन. ‘हिन्द युग्म’ने हा व्यवहार पूर्ण पारदर्शकतेने सार्वजनिक समारंभात केला. लग्नातील हुंड्यासारखे बंद दरवाजाआड व्यवहार न करता, त्यांनी लेखकाचा सन्मान उघडपणे केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार।

। दि. 7 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### चॅटजीपीटी, टेस्ला ऑटोपायलट यासारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे

# मानवी जीवन अधिक सुखकर - अजय देशपांडे

## शिक्षण विश्व: पीसीसीओईमध्ये उद्योग 4.0 कार्यशाळा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एचॅटजीपीटी, टेस्ला ऑटोपायलट यासारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन अधिक सुखकर होईल. यामुळे कमी खर्चात दळणवळण, संपर्क वेगाने होईल. याचा सकारात्मक परिणाम उत्पादन व सेवा क्षेत्रावर प्रकर्षाने होईल आणि भारताची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल अधिक जोमाने होईल. यासाठी आपण डिस्ट्रीब्युटेड डीप लर्निंग समजून घेऊन कायम अपडेट राहिले पाहिजे असे इन्सर्टिस सोल्युशन्स कंपनीचे अधिकारी अजय देशपांडे यांनी उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करताना सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय येथे 'एआयसीटीई - वाणी- व्हायब्रंट ॲडव्होकेसी फॉर ॲडव्हान्समेंट अँड न्युचरिंग ऑफ इंडियन लँग्वेजेस) यांच्या सहयोगाने “उद्योग ४.० साठी प्रगत संगणक” या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी देशपांडे बोलत होते. उद्घाटन पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे यांच्या हस्ते झाले. यावेळी संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अनुराधा ठाकरे, डॉ. प्रा. स्वाती शिंदे, सहा. प्रा. डॉ. सांत्वना गुडधे, पूजा पोहकर आदी उपस्थित होते. सीडॅक च्या तज्ज्ञांनी पॅरलेल प्रोग्रॅमिंग मॉडेल्स फॉर एआय चे प्रात्यक्षिक सादर केले.

इन्फोसिसचे हेमंत सेलमोकार यांनी 'हाय परफॉर्मन्स कम्प्युटिंग (एचपीसी),' आयए डेटा ॲनालिटिक्स प्रा. लि. चे प्रमुख श्रीकांत कोकाटे यांनी 'बिग डेटाचे कार्यक्षम व्यवस्थापन' टीसीएस रिसर्चचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सचिन पवार यांनी 'लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम्स) च्या आरोग्यसेवा, वित्त आणि उत्पादन क्षेत्रातील उपयुक्तता' आणि डॉ. स्वाती शिंदे यांनी 'एज कम्प्युटिंगची व्यावहारिक उपयुक्तता' आणि डॉ. अनुराधा ठाकरे यांनी 'इंटेलिजंट कम्प्युटिंग व मल्टी-ऑब्जेक्टिव्ह ऑप्टिमायझेशन' या विषयावर मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात आयआयआयटी पुणेचे डॉ. भूपेंद्र सिंह यांनी 'सायबर सुरक्षा क्षेत्रात एआयची दुहेरी भूमिका' याविषयी मार्गदर्शन केले. नागपूर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय निवृत्त प्रा. डॉ. अशोक मातनी यांनी 'क्वांटम कम्प्युटिंग मधील सिद्धांत, अल्गोरिदम, क्रिप्टोग्राफी व औद्योगिक अनुप्रयोग' या विषयावर आणि ‘ॲडेसो इंडिया’च्या प्रियांका शेटे यांनी ‘एआयच्या सहाय्याने नेक्स्ट जनरेशन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट’ या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा आढावा मुस्कान ठाकुर यांनी सादर केला. सूत्रसंचालन कोशदा भट यांनी आणि डॉ. सांत्वना गुडधे यांनी आभार मानले.

ही कार्यशाळा एआयसीटीई च्या सहयोगाने आणि पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तसेच पीसीयू चे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.न

# नम्रता लोंढे यांचा वाढदिवस विधायक उपक्रमांनी आदर्शवत!

## सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण : परिसरातील नागरिकांनी दिली दाद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**“सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा” हा आदर्श सध्या फारसा दिसत नसतानाच, माजी नगरसेविका नम्रता लोंढे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत समाजहिताचे विधायक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या नेतृत्वाखाली पूरग्रस्तांसाठी मदत, महिला सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांमधून प्रभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.**



वाढदिवसाच्या दिवशीच त्यांनी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एक हजार कुटुंबांना अन्नधान्य आणि अत्यावश्यक किट्सचे वाटप केले. वाढदिवसाची सुरुवात पांजरपोळ येथील गायींना चारा देऊन केली. प्रभाग स्वच्छ ठेवणाऱ्या १८० महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडीचोळी देऊन सन्मानित करण्यात आले.

याशिवाय, नवरात्रोत्सव 2025 च्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या स्पर्धांमध्ये विजेत्यांना ई-स्कूटर, फ्रिज, एलईडी टीव्ही, वॉशिंग मशिन, पिठाची गिरणी अशी भरघोस बक्षिसे देण्यात आली. विशेष म्हणजे, कुमारी भाविका मनोज आहिरे हिची भारतीय अंडर-19 क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल तिचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात लोकप्रिय गायक अवधूत गांधी यांचा लाईव्ह कॉन्सर्ट व प्रसिद्ध नृत्यांगणा राधा पाटील यांचा नृत्याविष्कार रंगला. महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या मंगळागौर आणि गौरी गणपती सजावट स्पर्धेत विजयी झालेल्या महिलांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ माजी नगरसेवक वसंत लोंढे, सुरेश म्हेत्रे, भाजप युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लांढे, उद्योजक कार्तिक लांडगे, उद्योजक प्रताप मोहिते, पोलिस निरीक्षक गणेश जामदार आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रभागातील नागरिकांनी देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून नम्रता लोंढे यांना शुभेच्छा दिल्या.

### महिलांना केंद्रस्थानी ठेवणारी विधायक भूमिका (नम्रता लोंढे)

माजी नगरसेविका नम्रता लोंढे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला. परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या १८० महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान, मंगळागौर व गौरी सजावट स्पर्धांमधून महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ, आणि विजेत्यांना दिलेली बक्षिसे — हे सर्व उपक्रम महिला सहभागाला प्रोत्साहन देणारे ठरले. त्यांची ही भूमिका प्रभागातील महिलांसाठी प्रेरणादायी असून, “लोकप्रतिनिधी म्हणजे केवळ राजकारणी नव्हे तर समाजासाठी कटीबद्ध मार्गदर्शकही असतो” हे त्यांनी सिद्ध केले आहे.

## सामाजिक जाणिवा : वाढदिवस साजरा न करता

# पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे संकलन!

## पिंपरी-चिंचवडमधील भाजपा मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांचा विधायक उपक्रम

| पिंपरी-चिंचवड : |
प्रतिनिधी : महाईन्यूज



**या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली, भारतीय जनता पार्टीचे मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी एक सामाजिक आणि विधायक निर्णय घेतला आहे. त्यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोणताही अनावश्यक खर्च न करता, तो निधी पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी वापरण्याचा संकल्प केला आहे.**

शिवराज लांडगे यांनी आवाहन केले आहे की, "या लढ्यात आपण सर्वांनी मानवतेच्या नात्याने खारीचा वाटा उचलणे आवश्यक आहे. अन्नधान्य, कपडे, पिण्याचे पाणी, औषधे किंवा इतर जीवनावश्यक वस्तू देऊन पूरग्रस्तांना मदतीचा हात द्या. आपल्या छोट्याशा हातभारामुळे एखाद्या कुटुंबाला नवजीवन मिळू शकते." या उपक्रमांतर्गत पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे संकलन सुरु करण्यात आले असून, अनेक सामाजिक संस्था, युवकवर्ग आणि नागरिकांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला आहे. "आपण दिलेली मदत ही केवळ वस्तू नाही, तर ती एक आशेचा किरण आहे – जी संकटात सापडलेल्या कुटुंबांना दिलासा आणि आत्मविश्वास देईल," असेही शिवराज लांडगे म्हणाले. तसेच, शासन आपली जबाबदारी निभावत असतानाच, नागरिकांनीही पुढे येऊन पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी एकजुटीने पाठीशी उभे राहण्याची हीच वेळ आहे, असेही शिवराज लांडगे यांनी म्हटले आहे.

> "मी वाढदिवस साजरा करण्याऐवजी पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे, कारण सध्या त्यांचा दु:खाचा काळ ही आपल्यासाठीही एक जबाबदारीची वेळ आहे. हे केवळ मदत नव्हे, तर माणुसकीचा खरा उत्सव आहे."
> – **शिवराज लांडगे,** मंडलाध्यक्ष, भाजपा.

---

# मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात!

## मराठवाडा युवा मंच वर्धापन दिन: मराठवाड्याच्या संस्कृतीचा, अस्मितेचा आणि प्रगतीचा आढावा

| चिखली | प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाडा युवा मंच संस्थेचा १३ वा वर्धापन दिन आणि मराठवाडा मुक्ती दिन सोहळा उत्साहात पार पडला. चिखली येथील टाऊन हॉल सभागृहात येथे झालेल्या या सोहळ्यात संस्थेच्या वाटचालीसह मराठवाड्याच्या संस्कृतीचा, अस्मितेचा आणि प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अतिरिक्त आयुक्त, वस्तू व सेवा कर उमाकांत बिराजदार, पोलीस उपायुक्त बापूसाहेब बांगर, महावितरणचे अधीक्षक अभियंता विजय फुंदे, एकनाथ महाराज संस्थान, श्री क्षेत्र पैठणचे योगीराज महाराज पैठणकर आदी उपस्थित होते.**




या कार्यक्रमातून संस्थेच्या १३ वर्षांच्या यशस्वी व प्रेरणादायी कार्याची झलक मांडण्यात आली. यावेळी समाजातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात आला. तसेच दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रधान आयुक्त, केंद्रीय सीमा शुल्क, उत्पादन शुल्क आणि जीएसटी सुरेंद्रकुमार मानकोसकर जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. तोरल इंडिया प्रा. लि. मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक भरत गित्ते यांना उद्योजक पुरस्कार, औद्योगिक सुरक्षा, आरोग्य संचालनालयचे अखिल घोगरे यांना प्रशासकीय पुरस्कार,इंद्रायणी विद्या मंदिरचे सहसंचालक डॉ. प्रा.एस. एन. पाटील यांना शैक्षणिक पुरस्कार, राजवीर हेल्थ सर्व्हिसेस प्रा. लि. डॉ. माधव चव्हाण वैद्यकीय पुरस्कार,ज्येष्ठ पत्रकार बंदेनवाज चौधरी यांना पत्रकारिता पुरस्कार, राष्ट्रपती पारितोषिक विजेते कलाकार सुमंत शिंदे यांना कला पुरस्कार, ओम फ्लावर्सचे केशव त्रिभुवन यांना युवा गौरव पुरस्कार तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे उपायुक्त किरण काकडे यांना मराठवाडा मित्र विशेष सन्मान देण्यात आला.

मराठवाडा युवा मंच ही संस्था गेल्या १३ वर्षांपासून समाजासाठी विविध उपक्रम राबवत असून, युवांना एक सकारात्मक दिशा देण्याचे कार्य करत आहे. यापुढेही संस्था सामाजिक कार्याची वाटचाल अव्याहतपणे पुढे सुरू ठेवेल, असा विश्वास संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## College of Pharmacy
## Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

# Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



## Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 - 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046